**प्रेसनोट दि. ०७.०६.२०२१**

श्री. किरण नामदेव भिंगारदेवे, वय ५७ वर्ष, मंडलअधिकारी पलूस वर्ग-३ व श्री. वसंत रामचंद्र गावडे उर्फ बापू वय ७१ वर्ष खाजगी इसम यांना ८,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी त्यांची पत्नीचे नावे जमीनी खरेदी केली आहे. सदर जमीनीच्या सातबारा उतार्‍याच्या नोंदीबाबत तक्रार करण्यात आली असून सदर तक्रारीची चौकशी मंडल अधिकारी श्री. भिंगारदेवे यांचेकडे सुरू होती. मंडल अधिकारी भिंगारदेवे यांनी तक्रारदार यांना जमीनी संदर्भातील तक्रारी अर्ज निकाली काढून जमीनीची नोंद मंजूर करण्याकरीता त्यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसमा बापू यांचे मार्फतीने १०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०८.०३.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०८.०३.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये खाजगी इसम बापू यांनी मंडलअधिकारी श्री. भिंगारदेवे यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चे अंती ८,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.०७.०६.२०२१ रोजी दत्तनगर या ठिकाणी सापळा लावला असता श्री. वसंत रामचंद्र गावडे उर्फ बापू वय ७१ वर्ष खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ८,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यानंतर खाजगी इसम श्री. वसंत रामचंद्र गावडे उर्फ बापू यांनी तक्रारदार यांचेकडून स्विकारलेल्या ८,०००/- रूपये लाच मागणी तसेच स्विकृती बाबत श्री. किरण नामदेव भिंगारदेवे, मंडलअधिकारी यांचे सहभागाबाबत खात्री केली असता त्यांचा सहभाग दिसून आलेने श्री. किरण नामदेव भिंगारदेवे, वय ५७ वर्ष, मंडलअधिकारी पलुस वर्ग-३ यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. किरण नामदेव भिंगारदेवे, वय ५७ वर्ष, मंडलअधिकारी पलुस वर्ग-३ व श्री. वसंत रामचंद्र गावडे उर्फ बापू वय ७१ वर्ष खाजगी इसम यांचे विरुध्द पलुस पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक व श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार बाळासाहेब पवार, सिमा माने, संजय संकपाळ, अविनाश सागर, अजित पाटील, रविंद्र धुमाळ, भास्कर भोरे, संजय कलगुटगी यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

p.l.

(गुरूदत्त मोरे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली